लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरवठा करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांमधील (लेसर प्रिंटरचे - Canon-LBP 151DW, Canon-246DW, Canon-465MFD DW, HP-202, HP-1008, HP-1020, HP-1606) लेसर प्रिंटरचे ७८ए, ३८८ए, १२ए, ३३७ व ०७० चे नवीन टोनर पुरविणेसाठी नोंदणीकृत तसेच इच्छूक सेवाधारकांकडून ही जाहीरात प्रसिध्द झालेपासून ते दिनांक १६/०५/२०२६ इ. रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

हुकूमावरुन,

सहा.अधिक्षक (वित्त विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर

दिनांक- ११/०५/२०२६

लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरविणे बाबत नियम व अटी खालीलप्रमाणे

०१.	पुरवठादाराचे जी.एस.टी. नंबर असलेस व निविदेचा दर समान असलेस जी.एस.टी. नंबर निविदाधारकास प्राधान्य देणेत येईल.
०२.	महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.
०३.	लेसर प्रिंटर – Canon-LBP 151DW, Canon-246DW, Canon-465MFD DW, HP-202, HP-1008, HP-1020, HP-1606) साठी आवश्यक असणारे नवीन टोनर ३३७, ३८८ए, ७८ए, १२ए व कॅनन ०७० टोनर पुरविणेसाठी येणारा खर्च निविदेमध्ये नमूद करावा. तसेच नवीन टोनर रिकामे झालेनंतर ते परत घेवून जाणेचे असून सदरहू रिकामे टोनर घेणेची किंमत सदर निविदेमध्ये नमूद करावी. नंतर वेगळा आकार/शुल्क दिले जाणार नाही.
०४.	निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांना राहील.
०५.	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील तालुका न्यायालयामधील लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरविणेचा कालावधी करार मंजुरीपासून एक वर्षाचा राहील.
०६.	टोनर व टोनरमधील शाई चांगल्या दर्जाची असणे गरजेचे आहे.
०७.	पुरवठादारांनी निविदेमध्ये प्रत्येक टोनरचा दर तसेच जी.एस.टी.ची टक्केवारी वेगवेगळी नमूद करावी.

०८.	सदरची जाहीरात जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या न्यायालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.
०९.	निवीदाधारकांनी निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे दिनांक १६/०५/२०२६ इ. रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने भराव्यात. नंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
१०.	सदर प्राप्त होणा-या निविदा दि. १८/०५/२०२६ इ. रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे निजीकक्षामध्ये उघडणेत येतील. त्यावेळी निविदाधारकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
११.	लेसर प्रिंटरचे नवीन टोनर पुरविणे करणेकरीताची सिलबंद निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे नांवे पाठविणेत याव्यात.
१२.	उपरोक्त नवीन टोनर जिल्हा न्यायालय, न्यायसंकूल इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर येथे निविदाधारकांनी पुरविणेचे आहेत.
१३.	सदरहू निविदा पाठविताना निविदाधारकांनी त्यासोबत आपला पॅन कार्ड क्रमांक, जी.एस.टी. प्रमाणपत्र व उद्योग आधार प्रमाणपत्र जोडावे.

<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>

१) संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूरचे (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशित करणेत यावी.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर नोटीस बोर्ड.